मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 10 जुलै 2024 | पान- 1

# ड्रोनव्दारे मालमत्तांच्या सर्वेक्षणाचा 'श्रीगणेशा'

## मालमत्ता दडविणे आता अशक्य : नोंदणी नसलेल्या मालमत्ता कर कक्षेत येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील मालमत्तांचे महापालिकेच्या वतीने अत्याधुनिक ड्रोनव्दारे सर्वेक्षण करण्यास सोमवार (दि.8) आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या उपस्थितीत सुरूवात झाली आहे. या सर्वेक्षणामध्ये वाढीव मालमत्ता, वापरात बदलासह सुमारे दोन लाख नवीन मिळकती सापडतील, असा अंदाज महापालिका प्रशासनाला आहे. सर्वेक्षणात शहरामधील प्रत्येक मिळकतीची नोंद होणार आहे. त्यामुळे हे सर्वेक्षण अत्यंत महत्वाचे असून कर संकलन विभागाचा महसूल दिड हजार कोटीपर्यंत जाण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. एकाच वेळी प्रत्यक्ष जाग्यावर जाऊन अंतर्गत मोजमापे घेणे, क्रमाने GEO-SEQUENCING करणे, सॅटेलाईट इमेज आणि आता ड्रोनच्या माध्यमातून 5 सेमी रिझोल्युशन असलेली शहराची इमेज यामुळे कुठलीही मालमत्ता कराच्या कक्षेतून सुटणे अशक्य आहे.

महापालिकेचा मालमत्ता कर हा मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत असून शहरात 6 लाख 30 हजार मालमत्ता आहेत. 2023-24 या आर्थिक वर्षात कर संकलन विभागाने महापालिकेच्या इतिहासात प्रथमच 977 कोटींचे कर जमा केला. दुसरीकडे शहर वाढत असताना मालमत्तांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, अनेक जण मालमत्तांची महापालिकेच्या दप्तरी नोंद करत नसल्याचे वेळोवेळी झालेल्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. यापूर्वी महापालिकेने 2013 मध्ये सर्वेक्षण केले असता यामध्ये सुमारे 35 हजार तर 2021 मध्ये झालेल्या सर्वेक्षणात 21 हजार नवीन मालमत्ता आढळून आल्या होत्या. मात्र, यानंतरही शहरात नोंद नसलेल्या मोठ्या मालमत्ता असण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेने प्रथमच अत्याधुनिक ड्रोनव्दारे सर्वेक्षण करण्याचा निर्णय आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी घेतला.

सोमवार(दि.8)पासून ड्रोनव्दारे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. त्याचबरोबर कर संकलन विभागाचे उत्पन्न वाढीसाठी विभागाच्या वतीने गेल्या सव्वा दोन वर्षांपासून विविध अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे, त्याचेच फलित म्हणून गतवर्षी इतिहासातील सर्वाधिक महसूल महापालिका तिजोरीत जमा झाला आहे. यामध्ये कर संकलन व कर आकारणी विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी, स्थापत्य कन्सल्टंट, टेक नाईन आणि फॉक्सबेरी टेक्नोलॉजी यांचाही मोठा वाटा आहे.

ड्रोन सर्वेक्षणाव्दारे मालमत्तांची पूनर्स्थळ निरीक्षण करण्यात येणार आहे. बांधकामातील बदलाबाबत नोंदणी घेऊन मालमत्ता कराचे उत्पन्न वाढविण्याबाबत सर्व समावेशक तथा तंत्रज्ञानाद्वारा एकत्रितरित्या संपूर्ण मालमत्तांची नोंदणी करण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेने अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेला जीआयएस आधारित मालमत्तांची नोंदणी सर्वेक्षण तथा कर मूल्य निर्धारण प्रकल्प राबविण्यात येत आहे.

### आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या प्रयत्नांना यश

शहरातील सर्व मालमत्ता कराच्या कक्षेत आणण्यासाठी ड्रोनव्दारे सर्वेक्षण गरजेचे होते. मात्र, शहर परिसरात संरक्षण विभागाच्या मिळकती आहेत. त्यामुळे ड्रोन सर्वेक्षणाला भारत सरकारच्या डायरेक्टर जनरल ऑफ सिविल एव्हिएशन (DGCA) मंत्रालयाची परवानगी घेणे आवश्यक होते. या परवानगीसाठी आयुक्त शेखर सिंह यांनी वेळोवेळी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला. अखेर सिंह यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. त्यामुळे आता संपूर्ण शहराचे अत्याधुनिक ड्रोनव्दारे सर्वेक्षण करण्यास सुरूवात झाली आहे. तर केंद्र सरकारकडून अधिकृत परवानगी घेऊन ड्रोनव्दारे सर्वेक्षण करणारी राज्यातील पहिली महापालिका ठरली आहे.

### दोन लाखपेक्षा जास्त मालमत्ता कर कक्षेत येणार

ड्रोन सर्वेक्षणासाठी अनुभवी एजन्सी स्थापत्य कन्सल्टंट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची नियुक्ती केली आहे. सध्या महापालिकेकडे शहराचे केवळ 30 ते 50 सेंटीमीटर रिझोलेशनचे सॅटेलाइट इमेज उपलब्ध आहेत. मात्र, ड्रोन सर्वेक्षण केल्यानंतर 5 सेंटीमीटर रिझोल्यूशनचे सॅटेलाइट इमेज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे मालमत्ता कराच्या कक्षेतून एकही वाढीव बांधकाम, नवीन मालमत्ता लपून राहणार नाही. शहरातील प्रत्येक मिळकतीचे अत्यंत सुक्ष्म मोजमाप होणार आहे. त्यातून पिंपरी-चिंचवड महापालिकेत अद्यापपर्यंत कर मूल्यांकन न झालेल्या जवळपास दोन लाख नवीन मिळकती मालमत्ता कराच्या कक्षेत आणून स्वउत्पन्नात मोठ्या प्रमाणावर वाढ करण्यास महापालिका प्रशासनास शक्य होणार आहे.



### महापालिका आपल्या दारी उपक्रम

» आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन तंत्रज्ञान विकसित करून आता "मनपा आपल्या दारी" हे अभियान राबविण्यात येत आहे. नागरिकांना मालमत्ता कर आकारणीबाबत सर्व माहिती एका क्लिकवर प्राप्त होणार आहे. सवलती, भरणा, कर आकारणी संदर्भात आक्षेप दाखल करून सुनावणी प्राप्त करणे, मालमत्ता कर विभागामार्फत केवळ एक सांकेतिक "युनिक प्रॉपर्टी आयडेंटिफिकेशन क्यू आर कोड" विकसित करण्यात येणार आहे. त्यावर स्कॅन करून सर्व मालमत्ता धारकांना घरबसल्या सुविधा ऑनलाइन उपलब्ध होणार आहेत.

> यापूर्वीही महापालिकेने शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण केले आहे. मात्र, प्रथमच अत्याधुनिक पध्दतीच्या ड्रोनव्दारे मालमत्तांचे सर्वेक्षण सुरू केले आहे. या सर्वेक्षणामुळे वाढीव मालमत्ता, वापरात बदल, नवीन मालमत्ता शोधण्यात मोठे यश येणार आहे. करमुल्यांकनातुन एकही मालमत्ता सुटणार नाही. त्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात भर पडणार आहे.
>
> - प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त

### मालमत्तांची माहिती मिळणार एका क्लिकवर

» या सर्वेक्षणातून मालमत्तांचे स्थळदर्शक नकाशांचे संगणकीकरण करणे, सर्वेक्षण करुन गोळा केलेली सर्व माहिती संगणकीकृत करुन डिजीटल फोटोग्राफ सह कर मुल्यांकन संगणक आज्ञावलीमध्ये एकमेकांस मालमत्ता निहाय जोडली जाणार आहे. जेणेकरुन कर आकारणी संबंधातील करपत्र क्षेत्रफळ, नकाशा, मालमत्तेचा फोटो व कर आकारणी एकत्रीतपणे संगणक आज्ञावलीद्वारा पाहता येणार आहे.




> महापालिकेकडे वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून विविध प्रकारचा डाटा उपलब्ध झालेला आहे. या माहितीचे एकत्रीकरण करून नागरिकांना आवश्यक माहिती एकाच ॲप मधून कशी उपलब्ध करून देता येईल याबद्दल पालिका प्रयत्नशील आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ प्रत्येक नागरिकाला कसा देता येईल याबद्दल सर्व प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यामुळे ड्रोनव्दारे मालमत्ता सर्वेक्षण या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नागरिकांना सेवेचा लाभ देण्यासाठी कर संकलनसह इतर विभागांनाही याची माहिती मिळणार आहे. ड्रोनच्या माध्यमातून मिळालेल्या अनेक अचूक भौगोलिक माहितीचा वापर करून इतर विभागांचे, शहरातील भौतिक सुविधांचे नियोजन करण्यासाठी सुद्धा याची मदत होणार आहे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक

> महापालिकेचा कर संकलन विभाग हा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. हा स्त्रोत मोठ्या प्रमाणावर बळकट करण्याची गरज होती आणि आहे. हे सक्षमीकरण करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, लोकाभिमुख कार्यप्रणाली यांचा अवलंब या गोष्टी महत्त्वाच्या असतात. माननीय शेखर सिंह यांचे जागतिक स्तराचे भान असलेले व्हिजन आणि माननीय अतिरिक्त प्रदीप जांभळे यांनी केलेले मार्गदर्शन, दिलेला पाठिंबा यातून कर संकलन विभागात सकारात्मक बदल घडून आलेले आहेत. यांच्याच नेतृत्वात या सर्वेक्षणाच्या माध्यमातून किमान 500 ते 600 कोटीच्या उत्पन्न वाढीचा टप्पा आम्ही गाठू शकू असा आम्हाला विश्वास आहे.
>
> - नीलेश देशमुख, सहायक आयुक्त, कर संकलन व कर आकारणी विभाग

# धोकादायक जाहिरातींचे सांगाडे तातडीने हटवा

## जुन्या इमारती, पूरप्रवण क्षेत्र आणि वाहतुकीच्या दृष्टीने अडचणीच्या क्षेत्रांची माहिती घेण्याच्या सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई करण्यात आली असली तरी काही ठिकाणी त्यांचे सांगाडे धोकादायकरित्या तसेच ठेवलेले आहेत. हे सांगाडे नागरिकांचे प्राण घेऊ शकतात. त्यामुळे ते तत्काळ दूर करावेत. महापालिका क्षेत्रात जुन्या इमारती, पूरप्रवण क्षेत्र आणि वाहतुकीच्या दृष्टीने अडचणीच्या क्षेत्रांची माहिती घ्यावी आणि त्या ठिकाणी आवश्यक उपाययोजना निश्चित कराव्यात, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिल्या आहेत.



जिल्हाधिकारी कार्यालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे आपत्ती व्यवस्थापनाबाबत आयोजित केलेल्या बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विठ्ठल बनोटे आदी उपस्थित होते.

डॉ. दिवसे म्हणाले की, पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर अपघात प्रवण क्षेत्रांची माहिती एकत्रित करावी. दरडी कोसळणे, पूल पाण्याखाली जाणे अशा घटनांची शक्यता असलेल्या ठिकाणची वाहतूक वेळीच बंद करावी. पर्यटनाच्या दृष्टीने धोकादायक ठिकाणी पर्यटकांना बंदी करावी. कोणतेही पर्यटक सायंकाळनंतर वनक्षेत्रात राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. पर्यटकांकडून नियमांचे पालन होईल याकडे विशेष लक्ष द्यावे. कृषी पर्यटनकेंद्रावरही सुरक्षेच्या नियमांचे पालन होईल यादृष्टीने सूचना द्याव्यात.

### शहरात केवळ 85 अनधिकृत होर्डिंग

**» महापालिकेने 'सार' आयटी कंपनीच्या माध्यमातून शहरातील होर्डिंगचा सर्वे करून घेतला होता. यामध्ये १८०० अनधिकृत होर्डिंग आढळून आले. वर्षभरात दीड हजार अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करून ते जमीनदोस्त करण्यात आले. अडीचशे अनधिकृत होर्डिंग दंड भरून नियमित करण्यात आले असून, महापालिका हद्दीत आता केवळ ८५ अनधिकृत होर्डिंग असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. अनधिकृत होर्डिंगमध्ये उरुळी देवाची आणि फुरसुंगी गावात ८४ तर औंधमध्ये १ होर्डिंग आहे.**

मावळ, मुळशी, भोर, वेल्हा यासह ग्रामीण भागात सर्पदंशाच्या लशी उपलब्ध असल्याबाबत खात्री करावी. जिल्हा आणि तालुकास्तरावर २४ तास नियंत्रण कक्ष सुरू ठेवावे. रस्ता सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. जलाशयात मासेमारीसाठी बोटींना परवानगी दिली असल्यास या बोटींचा पर्यटन किंवा प्रवासासाठी उपयोग होणार नाही याची दक्षता घ्यावी. सर्व यंत्रणांनी जीवितहानी रोखण्याचा संकल्प करावा, असे आवाहन डॉ. दिवसे यांनी केले.

शहरात अधिकृत होर्डिंग २५९८ असून, त्यापैकी २५५९ होर्डिंगच्या स्ट्रक्चरल ऑडिटचे अहवाल महापालिकेकडे आले आहेत. घाटकोपर येथील होर्डिंग दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर पुणे महापालिका हद्दीत एकही अनधिकृत होर्डिंग शिल्लक राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे आणि ज्या होर्डिंगचा स्ट्रक्चरल अहवाल आला नाही, त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश आकाशचिन्ह विभागाला दिले आहेत.

# येरवडा मेट्रो स्थानकास लवकरच ग्रीन सिग्नल!

## मेट्रो सुरक्षा आयुक्तांनी केली सिग्नल, लिफ्ट, अग्निशमनसह प्रवासी सुविधांची पाहणी

**पुणे | प्रतिनिधी**

येरवडा मेट्रोच्या स्थानका या महिन्यात सुरू होत असल्याने या स्थानकाची मेट्रो सुरक्षा आयुक्त पथकाकडून (सीएमआरएस) पाहणी करण्यात आली. या पाहणीत स्थानकावरील सिग्नल यंत्रणा, लिफ्ट, अग्निशमन यंत्रणा, आपत्कालीन व्यवस्था, प्रवाशांसाठी उभारलेल्या सुविधांची पाहणी 'सीएमआरएस' ने केली. काही दिवसात 'सीएमआरएस'ने हिरवा कंदिल दाखवल्यानंतर येरवडा मेट्रो स्थानक प्रवाशांच्या सेवेसाठी खुले होणार असल्याची माहिती महामेट्रोचे संचालक हेमंत सोनवणे यांनी दिली.



महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडून (महामेट्रो) येरवडा मेट्रोस्थानकाला लवकरच हिरवा कंदिल दाखवला जाणार आहे. येरवडा मेट्रो स्थानकाची पाहणी नुकतीच मेट्रो सुरक्षा आयुक्त पथकाकडून (सीएमआरएस) करण्यात आली. पथकाने येरवडा मेट्रो स्थानकावरील प्रवाशांच्या सोई सुविधांची पाहणी केली. स्टेशनवरील सिग्नल यंत्रणा, लिफ्ट, आपत्कालीन व्यवस्थेची पाहणी केली. मेट्रो स्थानकावरील किरकोळ कामे अजून बाकी आहेत. 'सीएमआरएस' परवानगी देताच येरवडा मेट्रो स्थानक सुरू होणार असल्याचे महामेट्रोचे संचालक हेमंत सोनवणे यांनी सांगितले.

या महिन्यात येरवडा मेट्रो स्टेशन सुरू झाल्यानंतर येथून मेट्रोचे प्रवासी संख्या वाढणार आहे. येरवडा परिसरातून दैनंदिन प्रवासी संख्या पंचवीस ते तीस हजाराने वाढणार असल्याचा अंदाज आहे. सध्या मेट्रो प्रवासीसंख्या नव्वद हजार असून येरवडा स्थानक सुरू झाल्यास हा आकडा सव्वा लाखांपर्यंत वाढू शकतो, असा अंदाज आहे.

येरवडा मेट्रो स्थानकाला महाराष्ट्र

### हवी पीएमपी शटल सेवा

**» येरवडा मेट्रोस्टेशनच्या तीन ते पाच किलोमिटर परिघात दाट लोकवस्ती आहे. त्यामुळे पीएमपीची शटल बस सेवा उपलब्ध झाल्यास मेट्रोच्या प्रवासी संख्येत वाढ होणार आहे. शास्त्रीनगर सरकारी वसाहत, येरवडा कारागृह कर्मचारी वसाहत, मनोरूग्णालय कर्मचारी वसाहत, पोलीस वसाहत, प्रतिकनगर, आदर्शनगर, टिंगरेनगर, फुलेनगर, रामसोसायटी, हरिगंगा सोसायटी येथील हजारो प्रवाशांना मेट्रोसुविद्या उपलब्ध होणार आहे.**

हौसिंग बोर्ड, शास्त्रीनगर सरकारी सहकारी वसाहत, राम सोसायटी, फुलेनगर, प्रतीकनगर, येरवडा प्रीझन प्रेस अशा ठिकाणी पीएमपीएलची फिडर बससेवा उपयोगी ठरू शकते. या परिसरातून दररोज हजारो प्रवासी मेट्रोला मिळतील, अशी आशा आहे.

**वाहनतळाचा अभाव**

मेट्रो प्रवाशांच्या दुचाकीसाठी वाहनतळांचा अभाव आहे. रामवाडी, कल्याणीनगर, मेट्रो स्थानकासह कुठेच वाहनतळ नाही. त्यामुळे अनेक प्रवाशी पथपथावर, रस्त्यावर दुचाकी लावून मेट्रोचा प्रवास करतात. याचा त्रास पादचा-यांना होतो. तसेच रस्त्यावर लावलेल्या वाहनामुळे अपघाताचा धोका संभवतो.

> मेट्रो सुरक्षा आयुक्त पथकाकडून (सीएमआरएस) येरवडा मेट्रो स्थानकाची नुकतीच पाहणी करण्यात आली. काही दिवसात सीएमआरएसची परवानगी मिळताच येरवडा मेट्रो स्टेशन सुरू करण्यात येणार आहे.
> **- हेमंत सोनवणे, संचालक, महामेट्रो.**

# मेट्रोला पडला सुशोभीकरण पुनर्स्थापनेचा विसर

## पिंपरी ते हॅरिस ब्रिज, दापोडी दरम्यानचे काम पूर्ण करण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे मेट्रोअंतर्गत पीसीएमसी स्थानक ते दिवाणी न्यायालय (पुणे) हा मार्ग सुरू आहे. मात्र, या कामासाठी पिंपरी-चिंचवड शहरातील मोरवाडी ते हॅरिस ब्रिज, दापोडी दरम्यान अडसर ठरणारे घटक काढून टाकण्यात आले होते. मात्र मेट्रोचे काम पूर्ण झाल्यावर सुशोभीकरणाचे पुनर्स्थापना करण्यात आलेली नाही. वास्तविक पाहता मेट्रोचे काम गतवर्षीच पूर्ण झालेले असून, २०२३ च्या पावसाळ्यात सुशोभीकरणाची रचना पूर्ववत करणे पर्यावरणाच्या दृष्टीने आवश्यक होते. मात्र, वर्ष उलटून देखील त्याची दखल मेट्रोने घेतली नाही. मेट्रोचे काम पूर्ण झाल्यानंतर सुशोभीकरण करणे बंधनकारक असूनही ते करण्यात मेट्रोकडून विलंब होत आहे

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व महामेट्रो दरम्यान झालेल्या कराराप्रमाणे सुशोभीकरण पुनर्स्थापन व वृक्षारोपण ही कामे अद्यापही प्रलंबित असल्याचे दिसून आले. शहराचा विकास होत असताना, दुसरीकडे अशाप्रकारे गलथान कारभार दिसून येत आहे. पिंपरी ते दापोडी या मेट्रोच्या कामादरम्यान झाडांचा विस्तार कमी करणे, पुनर्रोपण करणे, पूर्ण काढणे, त्याचप्रमाणे सुशोभीकरण करणे आदी कामे होती. दरम्यान काम झाल्यानंतर सुशोभीकरण नव्याने करणे आवश्यक आहे. तसेच, झाड काढल्याबाबत प्रतिवृक्ष १० झाडे रोपण करणे, बाधित वृक्षांपैकी पुनर्रोपित झाडांची देखरेख करणे आणि सुशोभीकरण नव्याने करणे अशी मागणी करण्यात आली होती.सद्यस्थितीमध्ये हा परिसर अतिशय बकाल दिसत आहे. प्रत्यक्षात पावसाळा सुरू होण्यापूर्वी काम अपेक्षित होते. मात्र पिंपरी-चिंचवड महापालिका आणि मेट्रो यांचा समन्वय नसल्याने हे काम लांबणीवर पडलेले असल्याचे दिसून येते. दुसरीकडे, पुणे महापालिकेच्या हद्दीत मेट्रोकडून कामाच्या वेळी सुशोभीकरण अथवा झाडे तोडण्यात आली होती. मात्र त्यानंतर ही सर्व कामे त्यांनी वेळेत पूर्ण केली. पण, पिंपरी-चिंचवड शहराचे हद्दीत हे काम पूर्ण करण्यासाठी दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येते. दरम्यान, पिंपरी-चिंचवड शहरात मेट्रो वेगाने धावू लागली आहे. प्रवासी संख्या आणि उत्पन्नही वाढले आहे. मात्र, मेट्रोकडून या कामाकडे वारंवार दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. दुसरीकडे, दीड वर्ष उलटूनही कामे होत नसल्याने नाराजी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे महामेट्रोचे महाव्यवस्थापक असलेले श्रावण हर्डीकर हे पूर्वी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त होते. तरीसुद्धा शहरासाठी तळमळ या अधिकाऱ्याकडून दिसून येत नाही.

पुणे मेट्रोअंतर्गत पीसीएमसी स्थानक ते दिवाणी न्यायालय (पुणे) हा मार्ग सुरू आहे. मात्र, या कामासाठी पिंपरी-चिंचवड शहरातील मोरवाडी ते हॅरिस ब्रिज, दापोडी दरम्यान अडसर ठरणारे घटक काढून टाकण्यात आले होते. मात्र मेट्रोचे काम पूर्ण झाल्यावर सुशोभीकरणाचे पुनर्स्थापना करण्यात आलेली नाही.



### मेट्रोकडे उपलब्ध नाही कामाची माहिती

» मेट्रोचे काम पूर्ण झाल्यानंतर सुशोभीकरण करणे बंधनकारक असूनही ते करण्यात मेट्रोकडून विलंब होत आहे. याबाबत पिंपरी-चिंचवड शहरातील वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य सुरेश वाडकर यांनी माहिती अधिकारात सुशोभीकरण कामाची माहिती मागवली होती. मात्र, मेट्रोकडे या कामाच्या आदेशाची प्रत उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे कामाच्या तपशिलाबाबत कागदपत्र उपलब्ध नसल्याची माहिती वाडकर यांना दिली. त्याचप्रमाणे पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण करावे, अशी मागणी देखील महापालिका आणि मेट्रो प्रशासनाला वाडकर यांनी केली आहे.

> या कामाबाबत निविदा काढण्यात आली आहे. ही जागा महापालिकेची असल्याने त्याबाबत निर्णय होत नव्हता. मात्र, या प्रश्नावर नुकतीच बैठक झाली आहे. मेट्रोकडून ते काम पूर्ण होणार आहे.
>
> - हेमंत सोनवणे, कार्यकारी संचालक, महामेट्रो

> हा कार्यक्रम नव्हता तर पिंपरी ते निगडी मेट्रोच्या पहिल्या पिलरसाठी काँक्रीटच्या कामाला सुरुवात केलेली आहे. नियोजित १३० आठवड्यांच्या वेळेत हे काम पूर्ण करायचे आहे. याकरिता मेट्रोने नियोजन केले आहे. त्या अनुषंगाने वेगाने काम सुरु केले आहे.
>
> - श्रावण हर्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो

# उद्योजकांच्या पैशांवर ‘पाणी’; पाणीपट्टीचा उद्योगांना फटका

## वीज, मिळकत करवाढ आदींसह विविध आर्थिक भुर्दंड सहन करणाऱ्या उद्योजकांना वाढीव पाणीपट्टीचा भारही सोसावा लागणार आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

वीज, मिळकत करवाढ आदींसह विविध आर्थिक भुर्दंड सहन करणाऱ्या उद्योजकांना आता वाढीव पाणीपट्टीचा भारही सोसावा लागणार आहे. जलसंपदा विभागाने दहा टक्के पाणीपट्टी दरवाढ करण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार, पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे १५ हजार लहान व मोठ्या उद्योजकांना वाढीव पाणीपट्टी देण्यासाठी खिशातील पैशांवर ‘पाणी’ सोडावे लागणार आहे. त्यामुळे, उद्योजकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

राज्य जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडून फेब्रुवारी २०२२ मध्ये राज्यातील औद्योगिक पाणी वापराचे दर प्रस्तावित करण्यात आले होते. त्यामध्ये २०२३-२४ आणि २०२४-२५ या आर्थिक वर्षात प्रत्येकी दहा टक्के वाढ प्रस्तावित करण्यात आली होती. त्याला मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार, जलसंपदा विभागाने ही दरवाढ लागू केली आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील उद्योजक संघटना या निर्णयाबाबत नाराजी व्यक्त करत आहेत. महापालिका विविध कर लावून उद्योगांचा खिसा रिकामा करत आहे. त्यामध्येच आता एमआयडीसीकडूनही वाढीवर दर आकारला जाणार आहे. सध्या शहरात सुविधांअभावी उद्योग स्थलांतर होण्याच्या समस्या वाढल्या आहेत. त्यामध्ये अशी विविध प्रकारची दर वाढ झाल्यामुळे उद्योगांचे स्थलांतर होण्याची शक्यता उद्योजक वर्तवित आहेत.



एमआयडीसीच्या वतीने औद्योगिक आस्थापनांना पाण्याचा पुरवठा केला जातो. यापूर्वी औद्योगिक प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना एक हजार लिटरमागे २४ रुपये ४० पैसे असा दर आकारला जात होता. नव्या वाढीव दरानुसार उद्योजकांना २६ रुपये ८२ पैसे द्यावे लागणार आहे. तर कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना १८ रुपये १५ पैसे ते ३६ रुपये ३ पैसे दर द्यावा लागणार आहे.

> सध्या एमआयडीसी परिसरात पाणीपट्टीचा दर २१ रुपयांपासून पुढे आहे. इमारत पूर्णत्वास नसेल; तर ३२.२५ असा दर आकारला जातो. सध्या आहे तेच दर मोठ्या प्रमाणात आहेत. पाण्यावर आधारित उत्पादन करणाऱ्या कंपन्यांसाठी अजून दरवाढ झाली; तर उद्योग करणे कठीण होईल. अनेक रबर, रसायने, सीएनसी बीएमसी, इंजिनिअरिंग उद्योगांमध्ये प्रत्येक मशीनला पाण्याची आवश्यकता असते. त्यांना वाढीव दर परवडणार नाही. कंपन्या स्थलांतराचे ते एक कारण होईल. त्यामुळे, असे दर सतत वाढवू नये.
>
> - अभय भोर, अध्यक्ष, फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन

> प्रत्येक वर्षी जुलै महिन्यात पाणीपट्टीत दहा टक्के दरवाढ केली जात आहे. त्यानुसार, यंदाही वाढ होणार आहे. हिंजवडी भागात २० एमएलडी पाण्याचा पुरवठा केला जातो. सध्या २४.४० रुपये एक हजार प्रति लिटरमागे दर आकारला जात आहे. त्यामध्ये दहा टक्के दरवाढ होईल.
>
> - प्रशांत डफाडे, सहायक अभियंता, पाणीपुरवठा विभाग, एमआयडीसी, हिंजवडी

# बोगस बियाण्याने शेतकरी हतबल

## अधिकारी मात्र वसुलीत मग्न, शिरूर तालुक्यात बऱ्याच ठिकाणी बाजरी बियाणे उगवलेच नाही

**पुणे | प्रतिनिधी**

कंपनीने बोगस बाजरीचे बियाणे दिल्यामुळे शिरूर तालुक्यात अनेक गावांमध्ये बाजरी बियाणे उगवले नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. पंचायत समितीचे कृषी अधिकारी मात्र दुकानदारांकडून वसुलीत मग्न असल्याची चर्चा होत आहे.

तालुक्यातील सविंदणे, कवठे, मलठण, टाकळी हाजी, फाकटे, आण्णापूर, आमदाबाद,पिंपरखेड, काठापूर, जांबुत, न्हावरे गोलेगाव, आंबळे, निमोणे, पाबळ ,जातेगाव कान्हूर मेसाई अशा अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांनी पाऊस पडल्यामुळे पेरणी केलेले बाजरी बियाणे उगवले नाही. त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

शिरूर तालुक्यात खरिपाचे एकूण २७ हजार ४३३ हेक्टर क्षेत्र आहे. त्यापैकी बाजरीची १९ हजार हेक्टरवर पेरणी झाली आहे. आतापर्यंत अनेक शेतकऱ्यांनी बियाणे विक्रेते व डिलर यांच्याकडे तोंडी तक्रारी केल्या आहेत. मात्र, आता शेतकरी पंचायत समितीच्या कृषी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार करणार असल्याचे सांगितले आहे.

तालुक्यातील अनेक गावांतील शेतकऱ्यांनी एका खाजगी कंपनीच्या बाजरी बियाण्याची पेरणी केली असल्याचे समोर आले आहे. त्यासंदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारी नंतर कंपनीच्या प्रतिनिधींनी पाहणी करून अहवाल वरिष्ठ कार्यालयाला पाठविला आहे. शेतकऱ्यांनी नुकसानभरपाई देण्याची मागणी त्यांच्याकडे केली आहे. या सर्व प्रकारानंतर तालुका कृषी विभाग काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. हे घडत असताना पंचायत समितीचे कृषी अधिकारी काय करतात हा मोठा प्रश्न उभा राहत आहे.



### नुकसानभरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी

» यंदा जूनच्या सुरुवातीला चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी लवकरच पेरण्या केल्या. शिरूर तालुक्यात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात बाजरीची पेरणी केली. मात्र, काही ठिकाणी बियाणे नित्कृष्ट दर्जाचे निघाल्याने उगवणच झाली नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. पेरणीसाठी शेतकऱ्यांनी एकरी जवळपास १० ते १५ हजार रुपयांचा खर्च केला आहे. याबाबत शेतकऱ्यांनी बियाणे देणारे डिलर, कृषी सेवा केंद्र दुकानदार, कृषी अधिकारी यांच्याकडे तोंडी तक्रारी केल्या आहे. शेतकऱ्यांनी नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

### शेतकऱ्यांच्या संकटात होतेय मोठी वाढ....

» शिरूर तालुक्यात विदयुत रोहीत्र, विद्युत मोटारी, केबलची चोरी, बिबट्याचे हल्ले, कधी कोरडा दुष्काळ तर कधी ओला दुष्काळ, कधी गारपीट तर कधी दुबार पेरणी, या संकटामुळे शेतकरी होरपळून निघत आहे. संकटाशी मुकाबला करत शेतकरी वर्षभराचे नियोजन करून पीक लागवड करताना दिसत आहे. आता शेतकरी बोगस बाजरी बियाणांमुळे उद्भवलेल्या पेरणीच्या संकटामुळे त्रस्त झाले आहेत. अगोदरच प्रचंड हालअपेष्टांनी युक्त जीवन जगणाऱ्या बळीराजाला दुबार पेरणी करावी लागणार आहे. बोगस बियाणे देऊन दुकानदार व कंपनीने शेतकऱ्यांची एकप्रकारे फसवणूकच केली आहे. ज्या कृषी सेवा केंद्रातून व कंपनीकडून हे बियाणे घेऊन शेतकऱ्यांनी पेरले त्या दुकानदार व कंपनीच्या अधिकाऱ्यांविरुद्ध फसवणुकीचे गुन्हे दाखल करावेत व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

" शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना खरेदीची पक्की पावती घ्यावी. त्यावर बियाणे खरेदी करणाऱ्याचे नाव, पिकाचे व जातीचे नाव, गट क्रमांक, उत्पादकाचे नाव व पत्ता, विक्रेत्याची सही ई त्यादी नोंदी असाव्यात. कोणतेही बियाणे घेताना परवानाधारक कृषी केंद्रधारक विक्रेत्यांकडून बियाणे खरेदी करावे. बियाण्याची उगवणक्षमता, शुद्धता, चाचणीची तारीख इत्यादी काळजीपूर्वक वाचावे. प्रमाणित बियाण्याच्या टॅगवर अधिकाऱ्यांची सही असल्याची खात्री करून घ्यावी. या कृषी विभागाच्या सूचना शेतकऱ्यांनी लक्षात घ्याव्यात म्हणजे शेतकऱ्यांची होणारी फसवणूक होणार नाही.

**- सिद्धेश ढवळे -तालुका कृषी आधिकारी.**

# एका फोनवर आला दहा कोटींचा निधी

## उरुळीतील गांधी विद्यालयाच्या इमारतीचे 15 ऑगस्टला होणार भूमिपूजन

**पुणे | प्रतिनिधी**

साहेबांनी मनात आणले तर एखाद्या संस्थेचा, एखाद्या गावाचा कायापालट कसा होऊ शकतो, याचे उदाहरण पुन्हा एकदा उरुळी कांचनच्या ग्रामस्थांनी अनुभवले. माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी उरुळी कांचन येथील महात्मा गांधी विद्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी एकाच बैठकीत व एका फोनवर एक नव्हे, दोन नव्हे तर तब्बल दहा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला.

उरुळी कांचन (ता. हवेली) येथील महात्मा गांधी सर्वोदय संघाचे शरद पवार अध्यक्ष असल्याने संस्थेच्या बैठकीसाठी येत दहा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याची किमया साधली आहे.

दरम्यान, पवारसाहेबांनी उपलब्ध करुन दिलेला निधी महिनाभरात संस्थेला मिळणार असून, येत्या 15 ऑगस्टला महात्मा गांधी विद्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजनही करण्यात येणार असल्याची माहिती महात्मा गांधी सर्वोदय संघाचे विश्वस्त सचिव सोपान कांचन यांनी दिली आहे.

या बैठकीला महात्मा गांधी सर्वोदय संघाचे विश्वस्त राजाराम कांचन, देविदास बन्साळी, संभाजी कांचन, महादेव कांचन, राजेंद्र टिळेकर, मनोहर कांचन आदी मान्यवर उपस्थित होते.सोपान कांचन म्हणाले, उरुळी कांचन येथील शैक्षणिक संकुलात 8 हजारहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहे.



### पवार यांचे उरुळी कांचनवर विशेष प्रेम

» शरद पवार यांचे उरुळी कांचन गावावर विशेष प्रेम आहे. शरद पवार यांनी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर ग्रामीण भागातील विद्यार्थी हा याच संकुलात शिकला पाहिजे. हे धोरण स्वीकारून त्यांनी आतापर्यंत 20 कोटीहून अधिक रुपयांचा निधी उपलब्ध करून महात्मा गांधी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, डॉ. सायरस पूनावाला इंग्लिश मीडियम स्कूल, डॉ. मणिभाई देसाई महाविद्यालय, बी. जे. शिर्के प्राथमिक विद्यालय व किमान कौशल्य विभाग या शाळा विद्यार्थ्यांसाठी अल्प व नि:शुल्क दरात सुरु केल्या आहेत.

" शरद पवार यांच्या माध्यामातून महात्मा गांधी विद्यालयाची नवीन इमारत बांधण्यात येणार आहे. ही इमारत बांधल्यावर विद्यार्थ्यांना भौतिक, शैक्षणिक सुविधांबरोबर प्रयोगशाळा व स्वतंत्र वाचनालय मिळणार आहेत. त्यामुळे विद्यार्थांना याचा नक्कीच गुणवत्ता वाढीसाठी फायदा होणार आहे. या इमारतीचे भूमिपूजनही शरद पवार यांच्या हस्ते 15 ऑगस्टला करण्यात येणार आहे. तसेच शरद पवार यांच्या छायाछत्रेखाली काम करण्याची संधी मिळाल्याने मी स्वत:ला भाग्यवान समजतो

**- संभाजी कांचन, विश्वस्त सचिव महात्मा गांधी सर्वोदय संघ**